# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**राज्यातील ग्रामीण भागातील गावठाणाची हद्द वाढविण्याबाबत**

**(१) ५५५५ (२७-०१-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील सर्वत्र गावातील गावठाणाची हद्द मागील काही वर्षापासून वाढविण्यात आली नसल्यामुळे ग्रामस्थांची गावठाणाची हद्द वाढविण्याबाबत संबंधितांनी वारंवार मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यांतील ग्रामीण भागातील गावांच्या गावठाणाची हद्द वाढविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) गावठाण विस्तार योजनेच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी शासन निर्णय व परिपत्रकाद्वारे आदेश देण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णय/ आदेश एकत्रित करुन, महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक दि.१०/२/१९८३ अन्वये गावठाण विस्तार कार्यक्रम राबविण्याबाबतची कार्यपध्दती विषद करण्यात आलेली आहे. त्यानुसार गावठाण विस्तार योजना या जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत गावठाण विस्तार करण्यासाठी निर्णय घेण्याचे अधिकार, जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.१९/३/२०१२ अन्वये, गावठाण विस्तार योजनेतील प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित उप विभागीय अधिकारी यांची मिळून एक त्रिस्तरीय सदस्य समिती गठित करण्यात आली आहे. प्रत्येक

जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या या समितीने जिल्ह्यातील गावठाण विस्तार योजनेतील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन कालबध्द पध्दतीने मोहिम हाती घेण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील गावांना रब्बी पीकविमा योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(२) ५०५९५ (१२-०५-२०१७). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील गावांना सन २०१४-१५ या वर्षात रब्बी पिक विमा योजनेतुन वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेल्हारा तालुक्यात मागील तीन वर्षापासून शेतकऱ्यांना दुष्काळाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१३-१४ या वर्षात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा कर्ज काढून सन २०१४ मध्ये पेरणी केली होती, परंतु पाऊस कमी पडल्याने पिकांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परिणामी अनेक शेतकरी कर्जबाजारी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तेल्हारा तालुक्यातील गावांना रब्बी पिक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :**(१) राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये तेल्हारा तालुक्यातील १८२६ शेतकऱ्यांनी रु. ७.७६ लाख विमा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला होता. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तेल्हारा तालुक्यातील कोणत्याही मंडळाला भारतीय कृषी विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मंजूर करण्यात आलेली नाही.

(२) तेल्हारा तालुक्यातील सर्व १०६ गावांची पैसेवारी सन २०१३-१४,२०१४-१५ व २०१५-१६ मध्ये ५० पैशांपेक्षा कमी होती, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सन २०१३-१४ मध्ये जून व जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तेल्हारा तालुक्यातील जमीनीचे व पिकांचे नुकसान झाले होते. सदर नुकसानीकरिता शासन निर्णय दि. १४.०८.२०१३ नुसार महसूल विभागामार्फत मदत जाहीर करण्यात आलेली होती.

राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१३ मध्ये तेल्हारा तालुक्यातील ४५६२ शेतकऱ्यांना रु. ८१.६० लाख, रब्बी हंगाम २०१३-१४ मध्ये ५४ शेतकऱ्यांना रु. १.२१ लाख, व खरीप हंगाम २०१४ मध्ये ७७९५ शेतकऱ्यांना रु. ४३६.४७ लाख नूकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठनासह पीक कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याच्या निर्णयाबाबत**

**(३) ५७२०८ (१५-०५-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन आणि त्यांच्याकडील पीक कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असुन त्यासंबंधीचा शासकीय आदेश काढण्यात आला नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेश काढण्यास विलंब लागल्यामुळे विदर्भातील ११,८६२ गावांमधील कर्जदार शेतकरी वंचित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उक्त आदेश तात्काळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१६/प्र.क्र.१/म-७, दिनांक २२ एप्रिल, २०१६ अन्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या विदर्भातील ११८६२ गावांमध्ये शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती व सहकारी पीक कर्जाचे पुर्नगठन या अतिरिक्त दोन सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर (नाशिक) तालुक्यातसह कर्जत (ता.जि.अहमदनगर) येथील गावांतील पाणी व चारा टंचाई दूर करण्याबाबत**

**(४) ५७७५४ (१५-०५-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (नाशिक) तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवू लागली असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी टँकर तसेच जनावरांसाठी चारा छावण्या सुरु करण्याची मागणी असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच कर्जत ता.जि.अहमदनगर येथे पाच जनावरांच्या छावण्या सुरु असून यामध्ये अंदाजे ९ हजार जनावरे दाखल झाली असून सर्वच छावण्यांना अदयापी अनुदान मिळाले नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावातील पाण्याचा व चाऱ्यांचा प्रश्न तातडीने सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१८) :** (१) दिनांक ३० एप्रिल, २०१६ रोजी १७ गावे व १२१ वाड्यांना एकूण २४ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता.
(२) कर्जत तालुक्यास ८६ टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविण्यात आले होते. तसेच कर्जत तालुक्यात माहे जून, २०१६ मध्ये पाच जनावरांच्या छावण्या सुरू होत्या. त्यासाठी रूपये २,८०,३९,९८९/- इतके अनुदान उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यापैकी २,७८,८०,५४६/- इतके अनुदान वाटप करण्यात आले असून दंडाची रक्कम रू.१५९४४३/- शासनाकडे समर्पित करण्यात आलेली आहे.

अनुदानाची रक्कम छावणी चालकांना वाटप करण्यासाठी शिल्लक नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(५) ५९३४४ (११-०५-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हयात सिंचनाच्या सोयी उपलब्ध होण्यासाठी सिंचन प्रकल्पाला मंजूरी देण्यात आली असून त्याकरिता शेतकऱ्यांच्या शेतजमिनी घेण्यात आलेल्या आहेत अशा प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना नोकरी देण्यात आलेली नसल्यामूळे वर्धा जिल्हयामध्ये साडेचार हजार प्रकल्पग्रस्त नोकरीपासून वंचित राहिले असल्याचे दिनांक १५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त सुशिक्षीत बेरोजगारांना व्यवसायासाठी एकर कमी १० लाख रूपये देण्यात यावे अशाप्रकारची मागणी करणारे निवेदन लोकप्रतिनिधीनी मा मुख्यमंत्री यांना दिनांक १० डिसेंबर, २०१६ आणि दिनांक १ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार वर्धा जिल्हयासह महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांना एकरकमी १० लक्ष रूपये देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८) :** (१) हे खरे नाही. तथापि, वर्धा जिल्हयात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वर्ग-३ व वर्ग ४ चे नोकरीसाठी एकूण ४५३४ प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्र दिलेले आहेत.

अर्हताधारक प्रकल्पग्रस्तांकरीता शासन सेवेत वर्ग ३ व ४ संवर्गातील पदभरतीमध्ये ५ % आरक्षण ठेवले असून प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूक स्पर्धा परिक्षेव्दारे व गुणवत्तेनुसार करण्यात येतात. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार पात्र भूधारकांना शासन निर्णय क्रमांक १०८४/प्र.क्र.३४३५/र-१, दि.३.५.१९८८ नुसार पुनर्वसन अनुदान देय असून सदर अधिनियमातील तरतुदीनुसार प्रकल्पग्रसतांना एकरकमी १० लक्ष रुपये देण्याची तरतुद नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दुष्काळ सदृश्य परिस्थितीसाठी आपत्ती निवारण निधीची उभारणी करण्याबाबत**

**(६) ६०६९५ (१६-०५-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात, चालु वर्षातील भीषण दुष्काळ स्थिती विचारात घेता, दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी, आपत्ती निवारण निधीची (डिझास्टर मिटीगेशन फंड) उभारणी करण्याचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने, केंद्र सरकार तथा राज्य सरकारांना दिनांक ११ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात टंचाईग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्यानंतर, किती दिवसात दुष्काळ जाहीर करावा याची शास्त्रीय तपासणी करुन, कालमर्यादा निश्चित राबविण्यात यावे असेही आदेश मा.न्यायालयाने दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश व आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१८) :**
(१) केंद्र शासनास आपत्ती निवारण निधीची स्थापना करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.
(२) व (३) महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ व दिनांक २८ जून, २०१८ अन्वये राज्यामध्ये दुष्काळी परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रामुख्याने पर्जन्यमान, वनस्पती निर्देशांक, मृदु आर्द्रता निर्देशांक, जलविषयक निर्देशांक व पिकांचे क्षेत्रिय/सत्यापन विचारात घेऊन दुष्काळ घोषित करण्याचे शास्त्रीय निकष व कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील शेतक-यांना पिक विमाचा लाभ मिळण्याबाबत

**(७) ६२१११ (१५-०५-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विमाचा लाभ मिळावा तसेच महसूल मंडळ नागठाण, केकतउमरा, राजगावं येथील शेतकऱ्यांच्या सोयाबीन व तुर ही पीके पिक विमापासून वंचित ठेवले असल्याचे माहे जून, २०१६ त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयामध्ये स्पीकंल्लर, ड्रीप यांचे शेतकऱ्यांना मागील दिवसापासुन अनुदान मिळाले नाही ते त्वरीत देण्यात यावे तसेच मागील दहा ते बारा दिवसापासुन नेट बंद असल्यामुळे सेतु मधुन सात बारा मिळत नसल्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत तरी सिंचन विहिरीचे रखडलेले अनुदान त्वरीत देण्यात यावे अशी मागणी नागरिकांची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सिंचन विहिरीचे प्रलंबित अनुदान त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) खरीप हंगाम २०१५ ची नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली असून, त्यानुसार वाशिम जिल्हयातील ३.०१ लाख शेतकरी योजनेत सहभागी झाले होते. त्यापैकी १.७९ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून, त्यांना रु.६९.५० कोटी इतकी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे. महसूल मंडळ नागठान, केकतउमरा व राजगाव या महसूल मंडळातील सोयाबीन व तूर पीकाचे पीक कापणी प्रयोगाव्दारे आलेले सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न यांच्या आधारे नुकसान भरपाई निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर महसूल मंडळातील सोयाबीन व तूर पीकास नुकसान भरपाई मंजूर झालेली नाही.

(२) ज्या शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनासाठी अर्ज केला आहे व ज्यांना पूर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे त्यापैकी ज्यांनी खरेदी केलेली आहे अशा शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांना अनुदानावर पुरविण्यात येणाऱ्या कृषीनिविष्ठासह अवजारांची खरेदीच्या निर्णयाबाबत

**(८) ६३७७६ (१५-०५-२०१७). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांना अनुदानावर पुरविण्यात येणाऱ्या कृषिनिविष्ठा तसेच अवजारांची खरेदी शेतकरी स्वतंत्रपणे कुणाही विक्रेत्याकडून करु शकतील असा निर्णय राज्य शासनाने दिनांक २४ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णय क्र. सुकृओ/२०१३/प्र.क्र.६३/११-A, दिनांक २४ जून, २०१४ या निर्णयाला राज्य शसनाने दिनांक २५ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास स्थगिती दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या स्थगितीमुळे शेतकऱ्यांना ठराविक पुरवठादारांकडूनच खरेदी करणे सवलतीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर स्थगितीचा निर्णय रद्द करण्यात यावा अशी मागणी लोकप्रिनिधींनी दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दिनांक २४ जून, २०१४ च्या शासन निर्णयात देण्यात आलेली स्थगिती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगर क्षेत्रात कंत्राटी खासगी बस वाहतूकदारांना प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेली सेवेची परवानगी रद्द करण्याबाबत**

**(९) ६५६८० (०७-०२-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर क्षेत्रात प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने कंत्राटी खासगी बस वाहतूकदारांना दिलेली सेवेची परवानगी रद्द करून मुंबईतील बेस्ट सेवा वाचविण्याची मागणी अध्यक्ष, बेस्ट समिती यांनी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु निवेदनाच्या अनुषंगाने कंत्राटी खासगी बस वाहतूकदारांना मुंबई महानगर क्षेत्रात प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेली सेवेची परवानगी रद्द करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, सदर प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (१६-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

बेस्ट समितीने मा.मुख्यमंत्री महोदयांना मुंबई महानगर क्षेत्रात प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने कंत्राटी खासगी बस वाहतूकदारांना दिलेली सेवेची परवानगी रद्द करून मुंबईतील बेस्ट सेवा वाचविण्यासाठीची मागणी दि.२९.०८.२०१६ रोजीच्या निवेदनाव्दारे केलेली आहे.

(२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास राज्यातील प्रवाशी वाहतूकीकरीता दि.२९.११.१९७३ च्या आदेशान्वये एकाधिकार योजना जाहिर करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये मोटार कॅब्स व वातानुकूलीत वाहनांना कंत्राटी परवान्यांवर वाहतूक करण्यास परवानगी दिलेली आहे. तसेच, सदर योजनेत दि.१६.०९.१९९३ रोजी झालेल्या सुधारणेनूसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एकाधिकार योजनेमध्ये महापालिका क्षेत्रामधील कंत्राटी बसेसना सुट देण्यात आली आहे. त्यानुषंगाने मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि.०८.०७.२०१६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.२२/२०१६ अन्वये क्र.१७६२/१९९९ मधील निर्णयाच्या अधिन राहून मुंबई महानगर क्षेत्रातील महापालिका क्षेत्रांमध्ये खाजगी कंत्राटी परवाना व खाजगी सेवा वाहन परवान्यांना परवानगी दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उमरखेड (जि.यवतमाळ) येथील अवैध प्रवासी वाहतुकीमध्ये झालेली वाढ

**(१०) ८४०९८ (१३-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील अवैध प्रवासी वाहतुकीत वाढ झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस विभागाशी हात मिळवणी करून अवैध वाहतुकीमुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैध वाहतुक रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयातील उमरखेड तालुक्यात अवैध प्रवासी वाहतूकीत वाढ झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयात अवैध प्रवासी वाहतूकदारांशी पोलीसांनी कोणत्याही प्रकारे हात मिळवणी केली नसून उमरखेड येथे अवैध प्रवासी वाहतुकीमुळे अपघात घडलेले नाही.

(३) अवैध प्रवासी वाहतूकीबाबत यवतमाळ जिल्हयात वाहतूक पोलिस व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कार्यालयाव्दारा नियमित तपासणी करण्यात येते. पोलिस विभागाकडून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याअंतर्गत सन २०१५ ते सन २०१७ या कालावधीत केलेल्या कारवाईत ४४३ गुन्हे नोंदविण्यात आलेले असून ८ वाहनांचे परवाने निलंबन करण्यात आलेले आहे.

तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ या कार्यालयाच्या वायुवेग पथकाव्दारे माहे एप्रिल २०१६ ते माहे मे २०१७ या कालावधीत खाजगी बस व खाजगी

बसेस व्यतिरिक्त १४२५ वाहनांवर कारवाई करण्यात असून ४२७ वाहनांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच रू.८१,६५,०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्हयातील रब्बी हंगामातील पिक कापणी प्रयोगाबाबत

**(११) ८७५४१ (१५-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयांमध्ये सन २०१५ मध्ये रब्बी हंगामात पिक कापणी प्रयोग घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील झालेल्या पिक कापणी प्रयोगामध्ये बऱ्याच त्रुटी असल्याबाबत शासनास वेळोवेळी अवगत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पिक कापणी कामात सरपंच, पोलिस पाटील, संबंधीत शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नसल्याचे व खोट्या सह्या केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उस्मानाबाद जिल्हयातील काही तालुक्यांमध्ये घेण्यात आलेल्या पीक कापणी प्रयोगांच्या वेळी ग्रामस्तरीय समितीच्या सर्व सदस्यांना उपस्थित राहण्याबाबत निमंत्रित करुन देखील काहीजण उपस्थित नसल्यामुळे काही सदस्यांची स्वाक्षरी पीक कापणी प्रयोगांच्या तक्त्यावर नसल्याची तक्रार प्राप्त झालेली होती. त्यानुसार याबाबत सविस्तर चौकशी करण्यात आली आहे. तसेच उस्मानाबाद जिहयात रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये गहू, ज्वारी, हरभरा, करडई, सूर्यफूल, मका, जवस या पिकांसाठी १३५२ पीक कापणी प्रयोगांचे आयोजन केलेले होते. त्यौपकी १३४४ पीक कापणी प्रयोगांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली जिल्हयातील शेतक-यांना अप्रमाणीत बियाणे, किटनाशकांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ८८६५३ (१५-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात शेतक-यांना गुणवत्तापूर्ण बियाणे, खते, किटकनाशके मिळावीत याकरीता यांची तपासणी केल्यानंतर पुनर्तपासणीत नमुना अप्रमाणीत आढळल्यास करण्यात आलेल्या कोर्ट केसचे जवळपास ५१ प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या केस अद्यापही प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरच्या प्रलंबित केसेस काढण्याबाबत तसेच उत्पादकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१), (२) व (३) सांगली जिल्ह्यात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे, खते, किटकनाशके मिळावीत याकरीता विभाग स्तरावर १, जिल्हास्तरावर १ व प्रत्येक तालुका स्तरावर १ अशा प्रमाणात एकूण १२ भरारी पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच, जिल्ह्यात एकूण ३४ गुणनियंत्रण निरीक्षकांमार्फत गुणनियंत्रणाचे कार्य पार पाडण्यात येत आहे.

सन २०१६-१७ मध्ये खते व किटकनाशकांच्या एकूण ५१ नमुन्यांपैकी ३८ नमुन्यांवर कोर्ट केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. एका नमुन्याच्या संदर्भात संबंधितांना ताकीद देण्यात आलेली असून उर्वरीत १२ नमुने पुनर्विश्लेषणामध्ये प्रमाणित आढळून आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळपेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांनी केलेले आंदोलन**

**(१३) ८९०८६ (१५-०८-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये सन २०१३-१४ या हंगामामध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सामुहिक शेततळे या योजनेतून तालुक्यातील शेतकऱ्यांनी शासनाच्या निर्माणधीन राहून काढलेली शेततळी व त्याबाबतच्या सर्व कागदपत्रांची कृषी अधिकारी यांच्या सूचनेनुसार पुर्तता करुनही त्याबाबतचे अनुदान न मिळाल्याने बळीराजा शेतकरी संघटनांच्यावतीने दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करुन आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाला दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती आंदोलकांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदरच्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१८) :** (१) होय.
(२) होय.

(३) सोलापूर जिल्ह्यात दि.३०/१०/२०१२ ते दि.०४/०६/२०१३ या कालावधीत पूर्वसंमती व कार्यारंभ आदेश न घेता पूर्ण झालेल्या १९३ सामुहिक शेततळयांना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांनी त्यांच्या दि.२०/११/२०१४ च्या आदेशान्वये मंजूरी देण्यात आली. सन २०१३-१४ मधील पूर्वसंमती व कार्यारंभ आदेश न घेता काम पूर्ण केलेल्या शेततळयांना अनुदान मिळावे यासाठी २२ शेतकऱ्यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सोलापूर कार्यालयापुढे अर्धनग्न उपोषण सुरू केले होते. त्यापैकी १९ शेतकऱ्यांच्या नावाचा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलो- त्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांनी मंजूरी दिलेल्या १९३ शेततळयांच्या प्रस्तावामध्ये समावेश असल्यामुळे सदर १९ शेतकऱ्यांना अनुदान वितरण आदेश क्र.मराफऔवमं/सा.शे./ हॉर्टनेट/२५४३/१७, दि.२६/०९/२०१७अन्वये रू.७०,८१,६१९/- एवढे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आटपाडी (जि.सांगली) तालुक्यात निकृष्ट दर्जाच्या कापूस बियाणे प्रकरणी नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१४) ९१५३१ (१५-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यात निकृष्ट दर्जाच्या कापूस बियाणे प्रकरणी संबंधीत कंपनीला नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याचे आदेश देऊनही नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अदयापपर्यत नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कायवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आटपाडी तालुका,जि.सांगली येथील शेतकऱ्यांनी मे.कृषिधन सिड्स प्रा.लि. या कापूस बियाणे कंपनीच्या सुपर फायबर- KDCHB- ४०७ बीजी १ या वाणाबाबतची तक्रार केलेली असून नुकसान भरपाई देण्याबाबतची विनंती केलेली होती. या संदर्भात जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीने प्रत्यक्ष प्रक्षेत्राची पहाणी करून सदर वाणामध्ये अनुवंशीक अशुद्धता आढळल्याचा अहवाल सादर केलेला होता. यानुषंगाने सदर वाणाचा परवाना रद्द करण्यात आलेला असून संबंधित शेतकऱ्यांना एकूण रूपये १,५१,०३,४३७/- नुकसान भरपाई देण्याचे आयुक्त (कृषि) यांनी आदेशीत केले होते. या संदर्भात सदर आदेशाविरूद्ध मे.कृषिधन सिड्स प्रा.लि. या बियाणे कंपनीने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन १२५७/२०१७ दाखल केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कापूस वाणावरील लावण्यात आलेली बंदी उठविण्याबाबत

**(१५) ९१९७९ (१५-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगाम सन २०१७ मध्ये कापूस राशी ६५९ वरील लावण्यात आलेली बंदी उठविण्याबाबतची विनंती शेतक-यांनी मा. कृषि मंत्री यांच्याकडे दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

खरीप हंगाम २०१७ मध्ये राशी ६५९ बी.जी.-२ या कापूस वाणावरील बंदी उठविण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, चंद्रपूर या कार्यालयांना शेतकऱ्यांची निवेदने प्राप्त झालेली होती.

(२) खरीप हंगाम २०१६ मध्ये जालना जिल्हयातील शेतकऱ्यांनी राशी ६५९ या वाणावर शेंदरी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याबाबतच्या तक्रारी दाखल केलेल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीने नुकसानग्रस्त प्रक्षेत्राची पाहणी करून राशी-६५९ हे वाण शेंदरी बोंड अळीला बळी पडल्याचे अहवालात नमुद केलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र कापूस बी-बियाणे अधिनियम, २००९ व नियम, २०१० मधील तरतुदींनुसार कापूस बियाणे विक्री परवान्यातुन राशी-६५९ हे वाण निलंबित करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रू.३६,८३,९३१/- इतकी नुकसान भरपाई देण्याबाबत आयुक्त (कृषि) यांनी मे. राशी सिड्स प्रा.लि. या बियाणे कंपनीला आदेशीत केलेले होते.

शासनाच्या आदेशाविरूद्ध मे. राशी सिड्स प्रा.लि. या बियाणे कंपनीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ६८०५/२०१७ दाखल केलेली होती. सदर प्रकरणी दिनांक ०७ ऑगस्ट, २०१८ रोजी अंतिम सुनावणी होवून मा. न्यायालयाच्या आदेशान्वये न्यायालयाकडे मे. राशी सिड्स प्रा.लि. या बियाणे कंपनीने जमा केलेली रक्कम रू.३६,८६,९३१/- व त्यावरील व्याज संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर तात्काळ जमा करण्याबाबतचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरखेड (जि. यवतमाळ) तालुक्यामध्ये पेरणीपूर्वी बियाण्यांची गुणवत्त्ता व शुध्दता तपासण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा उभारल्याबाबत**

**(१६) ९३८०४ (१५-०८-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि. यवतमाळ) तालुक्यातील कृषि विभागाने पेरणीपूर्वी बियाण्यांची गुणवत्त्ता व शुध्दता तपासण्याकरिता माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान स्वतंत्र यंत्रणा उभारली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या यंत्रणेमार्फत आतापर्यंत किती कंपन्यांच्या बियाण्यांची तपासणी करण्यात आली आहे,

(३) असल्यास, या तपासणीत कोणती बियाणी लागवडीयोग्य नसल्याचे आढळून आले असुन याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या आदेशान्वये तालुकास्तरीय भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) व (३) सन २०१७-१८ मध्ये, एकूण २१ बियाणे कंपन्यांचे ३८ बियाणे नमुने तपासणीकरीता काढण्यात आलेले होते. त्यापैकी ३६ नमुने प्रमाणित आढळून आलेले आहेत व २ नमुने अप्रमाणित आढळून आलेले आहेत. सदर अप्रमाणित नमुन्यांच्या प्रकरणांपैकी कापूस बियाणे अप्रमाणित नमुना प्रकरणात कोर्ट केस दाखल करण्यात आलेली आहे व उडिद बियाणाच्या अप्रमाणित नमुना प्रकरणात संबंधित उत्पादक व विक्रेता यांना ताकीद देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यात बियाणे पुरवठादार संस्थांनी शासनाची केलेली फसवणूक**

**(१७) ९४८७५ (१५-०९-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात शासन अंगीकृत बियाणे पुरवठादार संस्थांनी शासनाची सुमारे १ कोटी रुपयाची फसवणूक केल्याचे माहे जुलै, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या चौकशी अहवालात सदर संस्थांनी ३०-३८ टक्के जादा रकमेची देयके सादर केल्याच्या ठपका ठेवण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी साहित्य वितरक, शासन यंत्रणेच्या गैर साखळीत शेतक-यांना सुद्धा घेण्यात आल्याचे चौकशी अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यांवर व संस्थांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) होय. अकोला जिल्ह्यातील ४ कृषी सेवा केंद्रांनी उगवा गावातील १४६ शेतकऱ्यांच्या नावाने जिल्ह्यास पुरविलेल्या अनुदानित बियाण्यांपैकी ७०५ बॅगांची परस्पर उचल करुन खुल्या बाजारात धान्य म्हणून विक्री केली असल्याचे कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचे चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे.
(५) सदर प्रकरणी बियाण्यांची खुल्या बाजारात धान्य म्हणून विक्री करुन महाबीज व शासनाची फसवणूक केलेल्या मे. दिपक कृषी केंद्र यांचे महाबीज विक्रेते पद रद्द करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील पीक विमाचे ऑफ लाईन अर्ज मंजुरीसाठी प्रलंबित असल्याबाबत

**(१८) ९४९६१ (२२-०९-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय कृषी पिक विमा योजना खरीप सन २०१७ अंतर्गत दिनांक ४ व ५ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास महा ई सेवा केंद्रात शेतकऱ्यांचे विमा रक्कम न स्वीकारता ऑफ लाईन अर्ज भरून घेतले व सदर अर्ज छाननी व मंजुरीअभावी जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे प्रलंबित असल्याने व त्यावर निर्णय न झाल्याने सदर शेतक-यांची पिक विमा रक्कम भरून घेतली गेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीअंती सदर शेतकऱ्यांची विमा रक्कम त्वरित भरून घेण्यासह योजनेत सहभागी करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०१७ मध्ये योजनेत सहभागाची मुदत ४ ऑगस्ट २०१७ अशी होती. दि.५ ऑगस्ट २०१७ रोजी आपले सरकार सेवा केंद्रामार्फत ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात आले. दिनांक ५ ऑगस्ट २०१७ रोजी ऑफलाईन पध्दतीने लातूर जिल्हयातील ४८९३ शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतलेला आहे. सदर ४८९३ शेतकऱ्यांपैकी योजनेच्या निकषांनुसार पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील बियाणे कंपन्यानी बिजोत्पादक शेतकऱ्यांची केलेली फसवणूक**

**(१९) १०४४०३ (०३-०१-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील शेलू खडसे, मोरगव्हाण, मोप, लोणी बु., लोणी खु. इ. गावामध्ये कांदा बीजोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांनी, कंपन्यामार्फत मध्यस्थांनी कांदा बियाणाचे ३५ ते ४० हजार रुपये प्रति क्विंटल देण्याचा करार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, करारानुसार शेतकरी बीजोत्पादन घेण्याच्या कामाला लागले असता कंपन्यांकडून १६०० रु. प्रति क्विंटल दराने शेतकऱ्यांना एकरी १५ क्विंटल कांदा पुरविण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी बीजोत्पादन करुन ते कंपनीला दिले असता करारानुसार प्रति क्विंटल ३५ ते ४० हजार रुपये देण्याऐवजी शेतकऱ्यांना १३ रुपयांचे मागील दिनांकित धनादेश देण्यात येऊन, शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.कृषी मंत्री यांना पत्राद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

बियाणे कंपन्या बिजोत्पादक शेतकऱ्यांशी दराबाबत लेखी करार करीत नसल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

बियाणे कंपन्यांनी धनादेश दिल्याबाबतची बाब आढळून आलेली नाही.

(४) होय.

(५) यासंदर्भात चौकशी केली असता, शेतकऱ्यांकडे लेखी स्वरूपात दर करार केल्याचे दस्तावेज उपलब्ध झाले नाहीत. तसेच, कृषि विभागाच्या मध्यस्तीने कोणत्याही कंपनीने दर करार केलेला नाही. तसेच, याबाबत कोणत्याही स्वरूपाची तक्रार स्थानिक पातळीवर कृषि विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

---

**बीड जिल्हयात प्रकल्पग्रस्तांचे बनावट दाखले मिळत असलेबाबत**

**(२०) १०४८६० (१३-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात प्रकल्पग्रस्तांचे बनावट दाखले सन २००२ ते २०१४ या कालावधीत मिळत असल्याची तक्रार श्री संदीप मोरे यांनी मा. मुख्यमंत्री, मा. महसूल मंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोंडअळीचे नुकसान कमी दाखविण्यात आल्याप्रकरणी कृषी आयुक्तांकडे करण्यात आलेली तक्रार**

**(२१) १०५३९३ (०१-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोंडअळीने कापसाच्या पीकाचे ९० टक्के नुकसान झालेले असताना जिल्हा कृषी अधिक्षकांकडून जिल्हा तपासणीच्या अहवालात १५ ते २० टक्केच नुकसानीचा अहवाल देण्यात आला असून, या अहवालावर बियाणे कंपनीच्या प्रतिनिधीची स्वाक्षऱ्या तसेच सक्षम अधिकाऱ्यांचे रबर स्टॅम्प नसल्याची तक्रार तेल्हारा (जि.अकोला) शेतकऱ्यांनी दिनांक २४ जुलै, २०१७ वा त्यासुमारास कृषी विभागाला माहिती दिली तर, ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, अकोला यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसान भरपाईबाबत शेतकरी बियाणे कंपन्यांविरुध्द लोकन्यायालयात जाण्याच्या तयारीत असताना कृषी विभागाकडून हेतूपूरस्सर त्रूटीचा अहवाल देण्यात आल्यामुळे, न्यायालयात जाण्याचा मार्ग बंद झाला असून, कृषी विभाग बियाणे कंपन्यांविरुध्द न्यायालयात जाण्यास तयार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभाग बी.टी. कॉटन कंपनीला अभय देत असून शेतकऱ्यांवर अन्याय करत असल्याचे शेतकऱ्यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच बीयाणे कंपन्याचे हिसंबंध जपणाऱ्या कृषी विभागातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा,वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) २००९ व नियम २०१० मधील तरतूदीनुसार जिल्हास्तरीय समितीने प्रत्यक्ष क्षेत्राची तपासणी केलेली आहे.
(५) नुकसानीबाबत तपासणी अहवाल कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या शिफारशीनुसार तयार करण्यात आलेला असून कायद्यातील तरतूदीनुसार संबंधित बियाणे कंपनींकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतची कार्यवाही कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या स्तरावर सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भासाठी नव्याने कृषी धोरण आखणी करण्याबाबत

**(२२) ११०३१० (०१-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी विभागाच्या योजना पश्चिम महाराष्ट्रासाठी असल्याने विदर्भातील कृषी संकट गडद झाले असा निष्कर्ष मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी माहे नोव्हेंबर, २०१७ वा त्यादरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील अभ्यास दौऱ्यात काढला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुंबई विद्यापीठाच्या ३० विद्यार्थ्यांचे चमूने पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्यावर संशोधन करून वरील निष्कर्ष काढल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापकांनी दिव्या मराठी या वृत्तपत्रातील मुलाखतीत प्रतिपादन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यासावर आधारित बाबींचा अभ्यास करून धोरण आखणीबाबत विचार करणार आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत विदर्भासाठी नव्याने कृषी धोरण आखणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) हे खरे नाही
(२) हे खरे नाही
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(२३) ११०८२९ (०१-०४-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील १६४ शेतकऱ्यांनी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात कृषीधन कंपनीचे सोयाबीन बियाणे खरेदी करून उगवण झालेली नसल्याने कृषी विभागाकडे तक्रारी केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी अधिकाऱ्यांनी सदर बियाणे खराब असल्याचा अहवाल दिल्यामुळे शेतकऱ्यांनी संबंधित कंपनीकडे नुकसानभरपाईची मागणी केली. परंतु कंपनीने नकार दिल्याने शेतकऱ्यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचात दाद मागुन सर्व पुरावे सादर केल्यावर पुराव्यांच्या आधारे ग्राहक मंचाने तक्रार दाखल केलेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणेबाबत कंपनीला आदेश केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असुनही अदयापावेतो कोणतीच नुकसानभरपाई देण्यात आली नाही वा मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

उस्मानाबाद जिल्हयात खरीप हंगाम २०१४ मध्ये कृषिधन कंपनीच्या सोयाबीन बियाणांची उगवण क्षमता कमी असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.

या संदर्भात जिल्हयातील एकूण १४९ शेतकऱ्यांनी कृषिधन कंपनी विरोधात जिल्हा तक्रार निवारण मंचाकडे तक्रारी नोंदविलेल्या होत्या. यापैकी, १२५ प्रकरणांमध्ये बियाणे उत्पादक कंपन्यांना निर्दोष ठरवुन बियाणे विक्रेत्याने नुकसानभरपाई देण्याबाबत राज्य तक्रार निवारण आयोगाने आदेश दिलेले आहेत. उर्वरित २४ प्रकरणे राज्य तक्रार निवारण आयोगाकडे प्रलंबित आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बावनथडी प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२४) ११२४४४ (०१-०४-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यप्रदेश व महाराष्ट्र शासनाने संयुक्तपणे बावनथडी प्रकल्प उभारला असुन प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात रामटेक तालुक्यातील सात गावे आली असल्याने त्या गावांचे पुनर्वसन करण्यात आले असून मुलभूत/जनसुविधेची कामे अजुनही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या प्रत्येक कुटूंबातील एका सदस्याला नोकरीची प्रतिक्षा करावी लागत असून युवकांना वेगवेगळया व्यवसायाचे प्रशिक्षण दिले असूनही रोजगार दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पुनर्वसन करण्यात आलेल्या गावांमध्ये मुलभूत/जनसुविधेची कामे पूर्ण करण्याबाबत तसेच प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

बावनथडी प्रकल्पांतर्गत नागपूर जिल्हयातील रामटेक तालुक्यातील मौजा पुसदा, चिकनापूर ,पिंडकेपार,मुरझड व सितेपारटोला या बाधित गांवाचे पुनर्वसन मौजा चिचदा,रमजान घोटी, टांगला व पिंडकेपार येथे करण्यात आलेले आहे. पुनर्वसित गावठाणात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार १८ नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ दि.२७.१०.२००९ नुसार प्रकल्पग्रस्तांच्या व भूकंपग्रस्तांच्या नेमणूका जाहिरात देवून संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमदेवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेव्दारे गुणवत्तेनुसार करण्याची तरतूद आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्तांना व भूकंपग्रस्तांना शासकीय सेवेतील गट “क” व गट “ड” मधील पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील महाराष्ट्र हायब्रीड सिड्स कंपनी येथे पोलिसांनी टाकलेल्या छाप्याबाबत**

**(२५) ११२९४७ (०१-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूरनजिक असलेल्या धानोरा येथील महाराष्ट्र हायब्रीड सिड्स कंपनी (महिको) येथे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पोलिसांनी टाकलेल्या छाप्यानंतर नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेल्या तब्बल ५३२ बियाणे नमुन्याचा अहवाल अद्यापही प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अहवाल अद्यापपर्यंत न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती अहवाल प्राप्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या सूचनेवरून मे. महाराष्ट्र हायब्रीड सिड्स कंपनी लि. (महिको) या बियाणे कंपनीच्या मौजे. धानोरा, जि. बुलढाणा येथील बियाणे प्रक्रिया केंद्राची तपासणी करून एच.टी.बी.टी. प्रथिनांच्या तपासणीकरीता एकूण ५४८ कापूस बियाणांचे नमुने काढण्यात आलेले होते. सदर नमुन्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झालेला असून ८ नमुन्यांमध्ये एच.टी.बी.टी. जीन्स आढळून आलेले असून उर्वरीत ५४० नमुने प्रमाणित आढळून आलेले आहेत.

ज्या ८ बियाणे नमुन्यांमध्ये एच.टी.बी.टी. जीन्स आढळून आलेले आहेत, त्याच्याशी संबंधित ५८.४० क्विंट्ल अप्रमाणित बियाणे साठा केंद्र शासनाच्या जनुकीय अभियांत्रिकी मुल्यमापन समितीच्या (Genetic Engineering Appraisal Committee/GEAC) सूचनेनुसार जाळून नष्ट करण्यात आलेला आहे.

राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविरोधात सदर बियाणे कंपनीने मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ-नागपूर येथे रिट याचिका दाखल केलेली होती. सदर न्यायालयाच्या निकालाविरूद्ध मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाथरी (जि.परभणी) तालुक्यात शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या

**(२६) ११३१३८ (०१-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) तालुक्यात मागील ५ वर्षात आत्महत्या केलेल्या ५० आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबाचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सर्वेक्षण करुन त्यांना शासकीय मदत देण्यासाठी प्रशासनाने अहवाल तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालाआधारे शासनाच्या १८ योजनांसाठी लाभार्थी म्हणून शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची निवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, प्रशासनाच्या उदासिनतेमुळे अद्यापही या कुटूंबांना लाभ देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने सदर अहवालानुसार या कुटूंबियांना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत व याप्रकरणी दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) होय.

(२) हाय.

(३) योजनेचा लाभ देण्यासंदर्भात शासन निकषाप्रमाणे व उपलब्ध इष्टकाप्रमाणे लाभ देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील गुलाबी बोंड अळीग्रस्त शेतक-यांना बियाणे कंपन्यांकडुन नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत**

**(२७) ११३३४५ (०१-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील गुलाबी बोंड अळीग्रस्त शेतक-यांनी कृषी विभागाच्या आढावा बैठकीत आंदोलन करुन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधित शेतक-यांनी हेक्टरी १ लाख रुपये पीक नुकसान भरपाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती या आंदोलनाची व मागणीची दखल घेऊन शासनाने येथील गुलाबी बोंड अळीग्रस्त शेतक-यांना तातडीने आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शासनाच्या दिनांक ८.१२.२०१७ रोजीच्या आदेशान्वये गुलाबी बोंड अळीग्रस्त शेतकऱ्यांच्या बाधीत प्रक्षेत्राचे पंचनामे करण्यात आलेले आहेत.

महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सुमारे रू. ४४.४० कोटी इतके अनुदान मंजूर झालेले असून त्यापैकी रू.२९.६० कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच, गुलाबी बोंड अळीग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे कंपन्यांकडून नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबतचे आदेश बजावण्यात आलेले आहेत.

तसेच, गंगापूर तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी सन २०१७-१८ च्या पिक विमा योजनेमध्ये कापूस पिकाचा सहभाग नोंदविला होता, अशा शेतकऱ्यांना कापूस विम्यापोटी रू. १७.७२ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जुन्नर व आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील निकृष्ट दर्जाच्या बियाणांच्या विक्रीबाबत**

**(२८) ११३४२९ (०१-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर व आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यामध्ये विक्रीसाठी बंदी घालण्यात आलेला सिंजेटा कंपनीचे टोमॅटो बियाणे लपून विक्री केली जात असल्याचे पुणे जिल्हा परिषद कृषी विभागाने दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबेगाव तालुक्यातील बनावट बियाणे विक्रीप्रकरणी दुकानाचा बियाणे विक्रीचा परवाना कायम स्वरूपी रद्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील अनेक रोप वाटीकांमधील रोपांच्या निर्मीतीसाठी सिंजेंटा बियाने वापरण्यात येत आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती आंबेगाव तालुक्यातील बनावट बियाणे विक्रीप्रकरणी दुकानांचा बियाणे विक्रीचा परवाना तसेच सिंजेंटा कंपनीचा परवाना कायम स्वरूपी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर व आंबेगांव या तालुक्यांमध्ये विक्रीसाठी बंदी घालण्यात आलेल्या मे. सिंजेंटा इंडिया कंपनीच्या टोमॅटो टिओ-१०५७ या वाणाच्या बियाणांची लपून विक्री केली जात असल्याची तक्रार माहे जानेवारी, २०१८ मध्ये पुणे जिल्हा परिषद कृषि विभागाकडे प्राप्त झाल्याने मे. थोरात कृषि सेवा केंद्र, मंचर, ता. आंबेगाव या दुकानाची तपासणी घेतली असता टोमॅटो टिओ-१०५७ या वाणाच्या बियाणांची विक्री केल्याचे आढळून आले. सदर विक्रेत्याने बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ चे उल्लंघन केल्यामुळे मे. थोरात कृषि सेवा केंद्राचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेला आहे.

(३) व (४) आंबेगांव व जुन्नर तालुक्यातील परवानाधारक रोपवाटीकांची गुण नियंत्रण निरीक्षकांमार्फत तपासणी केली असता सिंजेंटा कंपनीच्या टोमॅटो टिओ १०५७ या वाणांची रोपे आढळून आलेली नाहीत.

(५) बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ चे उल्लंघन केल्यामुळे मे. थोरात कृषि सेवा केंद्राचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृषि महाविद्यालय नविन इमारतीत सुरु करावे तसेच वसतिगृह सुरु करण्याबाबत**

**(२९) ११४०४० (०१-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत सुरु असलेले कृषि महाविद्यालय विद्यार्थ्यांना गैरसोयीचे असल्याने कृषि महाविद्यालय नविन इमारतीत सुरु करावे तसेच वसतिगृह सुरु करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास विद्यार्थ्यांनी लेखी निवेदने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, चौकशीअंती डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत कृषि महाविद्यालय नविन इमारतीत सुरु करावे तसेच वसतिगृह सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-११-२०१८) :** (१) होय.

(२), (३) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर कृषि महाविद्यालय लवकरच नवीन इमारतीत सुरु करण्यांत येईल. सद्य:स्थितीत प्रशासकीय व शैक्षणिक इमारत, मुलांचे व मुलींचे वसतिगृह, मुलांची खानावळ इमारत, प्रसाधगृहे या इमारतीची बांधकामे अंतर्गत विद्युत पुरवठा तसेच पाणीपुरवठा या बाबींसह पूर्ण झाली आहेत. मुलींचे वसतिगृह महाविद्यालय प्रशासनाने २०१३ चे शैक्षणिक सत्रापासुन ताब्यात घेवुन तेथे महाविद्यालयीन वर्ग तसेच कार्यालयीन कामकाज सुरु केले आहे..

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**कापसाच्या बियाणांच्या सदोष वाणामुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे झालेले नुकसान**

**(३०) ११४८५० (०१-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कापसाच्या बियाणाचे सदोष वाण शेतकऱ्यांना पुरविल्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या पिकांवर बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे करोडो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीबाबत पंचनामे करण्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आदेश दिले असुन वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात अधिकाऱ्यांनी घोड्यावर बसून तर अन्य तालुक्यात शेताच्या बांधावर बसूनच पंचनामे केले असल्याचे दि.२७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तंत्रज्ञान पुरवठादार (मोन्सॅन्टो) आणि बियाणे कंपन्या यांच्यात झालेल्या करारापोटी मोन्सॅन्टोला बियाणाच्या प्रति पाकिट ४९ रुपये स्वामित्व धन देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कराराशी सर्वसामान्य शेतकऱ्यांचा संबंध नसल्याने बियाणे उत्पादक कंपन्या आणि फुटकळ विक्रेते असे सर्व या साखळीत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यास बाधिल असल्याचे स्पष्टीकरण कृषी सचिव यांनी दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या तंत्रज्ञान पुरवठादार व बियाणे कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबत दिनांक २८.१२.२०१७ रोजीच्या दैनिक लोकमतमध्ये वृत्त प्रसारीत झालेले होते. सदरची बातमी ही चुकीची असल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(३) सदरची बाब ही केंद्र शासनाशी संबंधित आहे. केंद्र शासनाच्या दिनांक १२.०३.२०१८ च्या अधिसुचनेनुसार रूपये ३९/- प्रति पाकीट असे स्वामित्व धन ठरविण्यात आलेले आहे.
(४) व (५) महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा,वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) २००९ व नियम २०१० मधील तरतूदीनुसार जिल्हास्तरीय समितीने प्रत्यक्ष क्षेत्राची तपासणी केलेली आहे.

नुकसानीबाबत तपासणी अहवाल कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या शिफारशीनुसार तयार करण्यात आलेला असून कायद्यातील तरतूदीनुसार संबंधित बियाणे कंपनींकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतची कार्यवाही कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या स्तरावर सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोणा (ता.यावल, जि.जळगांव) येथे केळीची रोपे (टिश्यु) तयार करण्याचा प्रकल्प मंजूर करण्याबाबत.

**(३१) ११५००३ (०१-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील यावल, रावेर, फैजपुर या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात केळीची लागवड होत असल्यामुळे मौजे हिंगोणा (ता.यावल) येथे केळीची रोपे (टिश्यु) तयार करणाऱ्या प्रकल्पाची जनतेकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती स्थानिक शेतकऱ्यांना कमी किंमतीत केळीची रोपे उपलब्ध होणार असल्यामुळे सदर प्रकल्प मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी मौजे हिंगोणा, ता. यावल, जि. जळगांव येथे इंडो-इस्त्राईल कृती आराखडा २०१५-२०१८ अंतर्गत केळी गुणवत्ता केंद्र व नवीन उत्तीसंवर्धन प्रयोगशाळा उभारणेबाबतचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयास सादर केला. तसेच केळी गुणवत्ता केंद्र स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव इस्त्राईल दुतावासास अभिप्रायासाठी सादर केला होता. तथापि, इस्त्राईल देशाचे मा. कृषि मंत्री यांचे समवेत दिनांक ०७.०४.२०१६ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत इंडो-इस्त्राईल कृती आराखड्यानुसार तिसऱ्या टप्प्यामध्ये केळी पिकासाठी मार्गदर्शक उपलब्ध नसल्यामुळे हिंगोणा येथील केळी गुणवत्ता केंद्रास मान्यता मिळणार नाही. त्यामुळे याच ठिकाणी केळी गुणवत्ता केंद्राऐवजी भाजीपाला गुणवत्ता केंद्राचा प्रस्ताव केंद्र शासनास व इस्त्राईल दुतावासास सादर करण्याच्या सूचना अपर मुख्य सचिव (कृषि) यांनी दिल्या होत्या. त्याप्रमाणे भाजीपाला गुणवत्ता केंद्र, हिंगोणा, ता. यावल, जि. जळगांव येथील गुणवत्ता केंद्राचा प्रकल्प प्रस्ताव श्री. डॅन ॲलुफ इंटरनॅशनल डेव्हलपमेंट, को-ऑपरेशन (माशाव) सायन्स ॲन्ड ॲग्रीकल्चर ऑफ इस्त्राईल यांचेकडे पाठविला होता. तथापि, त्यावरील त्यांचे अभिप्राय प्राप्त झाले नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनगाव राजा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथे शेतजमिनीच्या मूल्यांकासाठी कृषी अधिकाऱ्यांनी लाच मागितल्याबाबत**

**(३२) ११७२८३ (०२-०८-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनगाव राजा (ता.सिंदखेड राजा,जि.बुलढाणा) येथे समृध्दी महामार्गासाठी दिलेल्या शेतजमिनीच्या मूल्यांकानासाठी कृषी अधिकाऱ्यांनी ७ लाख रुपयांची लाच मागितल्यामुळे निराश झालेले शेतकरी श्री.नंदकिशोर मोटे यांनी विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक १३ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार दोषी कृषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, श्री.नंदकिशोर माटे यांच्या शेतजमिनीवरील झाडाचे मुल्यांकनाबाबत दि. १० ते ११ मार्च २०१७ रोजी झालेल्या स्थळ पाहणी (पंचनामा) आणि त्यावेळी केलेल्या व्हिडीओ शुटिंगनुसार त्यांच्या शेतजमीनीवरील झाडांचे मुल्यांकन करण्यात आले आहे.जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीने सदर मुल्यांकनास दि. ३०/१०/२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे श्री. माटे यांचे फळझांडाचे मुल्यांकन प्रलंबित नाही. श्री. माटे यांना सदर मुल्यांकन मान्य नसून ते १०० आंबा फळ झाडाचे मुल्यांकन करण्याची मागणी करीत आहेत तथापि, त्यांच्या शेताची स्थळ पाहणी (पंचनामा) व व्हिडीओ शुटिंग केली त्यावेळेस १०० आंबा झाडे प्रत्यक्षात शेतात अस्तित्वात नव्हती, त्यामुळे १०० फळझाडाचे मुल्यांकन करण्यात आलेले नाही, असे श्री. माटे यांना अवगत करण्यात आले आहे. तरी देखिल त्यांनी आपली मागणी मान्य व्हावी म्हणून विषप्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला परंतू प्रशासनाने प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सदर प्रसंग टाळला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाहन योग्यता तपासणीसाठी २५० मीटरचा चाचणी ट्रॅक उभारण्यासाठी मुंबईत जागा न मिळाल्याबाबत

**(३३) ११७४१९ (२३-०७-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये वाहनाच्या वार्षिक योग्यता तपासणीसाठी पुरेशी जागा नसून वाहनांच्या फिटनेस तपासणीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या आवारामध्ये २५० मीटरचा चाचणी ट्रॅक बंधनकारक असल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रॅक उपलब्ध न झाल्यास वाहनांची योग्यता तपासणी होणे अशक्य असल्याने योग्यता प्रमाणपत्राशिवाय वाहने चालविण्याचा धोका वाढू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहनाच्या वार्षिक योग्यता तपासणीसाठी पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय,मुंबई (पू) साठी ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारणीसाठी शिवाजीनगर, गोवंडी येथील बेस्टची जागा भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांना

विनंती करण्यात आली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (मध्य) साठी वडाळा ट्रक टर्मिनस येथील प्लॉटवर ब्रेक टेस्ट घेण्यास परवानगी मिळण्यासाठी मा. उच्च न्यायालयात सीव्हील ॲप्लीकेशन क्र. २७/२०१८ दाखल करण्यात आला आहे. तसेच कार्यालयाच्या जागेतील काही बांधकामे पाडून तिथे ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारता येईल किंवा कसे याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सल्याने तपासणी करण्यात येत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (प) साठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी काही अटींच्या अधिन राहून मौजे वर्सोवा येथील जागा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (प) साठी उपलब्ध झालेल्या जागेमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरिवली यांना ब्रेक टेस्ट घेण्यास परवानगी मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालयात सीव्हील ॲप्लीकेशन क्र. २७/२०१८ दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा परिषदांच्या कृषी विकास अधिकाऱ्यांकडील बियाणे, खते, किटकशाकांच्या विक्री परवान्याची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३४) ११८६२५ (३१-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषदांच्या कृषी विकास अधिकाऱ्यांकडील बियाणे, खते, किटकशाकांच्या विक्री परवान्यांचे अधिकार काढून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांना सोपविण्यात आले, परंतु तेथे पुरेसे सक्षम मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने परवान्यांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बियाणे, खते व किटकनाशकांच्या विक्री परवान्यांची प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात बियाणे, खते, औषधे या निविष्ठांसाठी जिल्हा परिषदांच्या कृषि विकास अधिकाऱ्यांऐवजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना परवाना अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत राज्यात बियाणे, खते व किटकनाशकांसाठी नवीन

परवाना, परवाना नुतनीकरण व परवाना सुधारणा असे एकूण २५,३२२ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी १८०३३ प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले असून ११९१ प्रस्ताव त्रुटींची पुर्तता न झाल्याने नामंजूर करण्यात आलेले आहेत. उर्वरित ६०९८ प्रस्ताव मंजूरीच्या टप्प्यात आहेत. सदर प्रलंबित प्रस्ताव कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांची मदत घेवून परवाने मंजूरीचे काम प्राधान्याने करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भामा-आसखेड (जि.पुणे) धरणातून पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या जॅकवेलचे काम प्रकल्पग्रस्तांनी रोखून ठेवल्याबाबत**

**(३५) ११९५४९ (२३-०७-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील भामा-आसखेड धरणातून पुणे महानगरपालिकेला २.५० टीएमसी पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या जॅकवेलचे काम प्रकल्पग्रस्तांनी रोखून ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जॅकवेलचे काम पुन्हा सुरु करण्यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्‌यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) भामा आसखेड प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रातील एकूण १४१४ प्रकल्पग्रस्तांपैकी १११ प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी जमिन मिळणेसंदर्भात नुकसान भरपाई ६५ % रक्कम कपात करुन दिली असून त्यापैकी बहुतांश प्रकल्पग्रस्तांना खेड व शिरुर तालुक्यात पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. ६५% रक्कम कपात करुन न दिलेल्या १३०३ प्रकल्पग्रस्तांपैकी ३८८ प्रकल्पग्रस्तांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे पर्यायी जमिन मिळणेबाबत याचिका दाखल केल्या आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल ३८८ याचिकांमध्ये दिलेल्या निर्णयानुसार संबंधितांना कलम १६ (२) (अ) च्या नोटीसा देण्यात आल्या असून त्यांची पात्रता यादी प्रसिध्द करुन त्यांना पर्यायी जमीन वाटपाबाबत आवश्यक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. बाधित क्षेत्रांच्या संकलन दुरुस्ती संदर्भात प्रकल्पग्रस्तांचे एकूण २५९ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जाची छाननी करुन त्यांचे संकलनाच्या दुरुस्तीबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत आहे.

---

**बोंड अळीमुळे नुकसान झालेली भरपाईची रक्कम बियाणे उत्पादक कंपन्याकडून वसूल करण्याबाबत**

**(३६) १२०२०१ (२४-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचे बोंड अळीमुळे नुकसान झालेल्या नुकसान भरपाईची अर्धी रक्कम बियाणे उत्पादन कंपन्याकडून वसूल करण्याची घोषणा मा. कृषी मंत्री यांनी माहे डिसेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान करुनही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना बोंड अळीमुळे झालेल्या नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) व (२) गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिकाचे नुकसान झाल्याबाबतच्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारींपैकी कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सुमारे ११ लाख ३८ हजार प्रस्ताव प्राप्त झालेले असून त्यापैकी सुमारे १० लाख २५ हजार शेतकऱ्यांना महाराष्ट्र कापूस बी-बियाणे अधिनियम,२००९ व नियम, २०१० मधील तरतुदींनुसार सुमारे ११४७ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याबाबत बियाणे कंपन्यांना आदेशीत करण्यात आलेले आहे. उर्वरित शेतकऱ्यांना बियाणे कंपन्यांकडून नुकसान भरपाई देण्याचे आदेश निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनगावराजा (जि.बुलढाणा) येथील शेतक-याने आत्महत्या करण्याचा केलेल्या प्रयत्नाबाबत**

**(३७) १२१०६३ (३०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनगांवराजा (जि.बुलढाणा) येथे समृध्दी महामार्गात शेतजमीन गेलेल्या बाधित शेतकऱ्यांच्या आंब्याच्या बागेचे मूल्यांकन वगळल्याने व त्यासाठी रक्कम मागणा-या लाचखोर अधिका-यांच्या कारभाराला कंटाळून दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शेतक-याची प्रकृती अत्यवस्थ आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच शेतक-याला शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

श्री.नंदकिशोर माटे यांच्या शेतजमिनीवरील झाडाचे मुल्यांकनाबाबत दि. १० ते ११ मार्च २०१७ रोजी झालेल्या स्थळ पाहणी (पंचनामा) आणि त्यावेळी केलेल्या व्हिडीओ शुटिंगनुसार त्यांच्या शेतजमीनीवरील झाडांचे मुल्यांकन करण्यात आले आहे.जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीने सदर मुल्यांकनास दि. ३०/१०/२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे श्री. माटे यांचे फळझांडाचे मुल्यांकन प्रलंबित नाही. श्री. माटे यांना सदर मुल्यांकन मान्य नसून ते १०० आंबा फळ झाडाचे मुल्यांकन करण्याची मागणी करीत आहेत तथापि, त्यांच्या शेताची स्थळ पाहणी (पंचनामा) व व्हिडीओ शुटिंग केली त्यावेळेस १०० आंबा झाडे प्रत्यक्षात शेतात अस्तित्वात नव्हती, त्यामुळे १०० फळझाडाचे मुल्यांकन करण्यात आलेले नाही, असे श्री. माटे यांना अवगत करण्यात आले आहे. तरी देखिल त्यांनी आपली मागणी मान्य व्हावी म्हणून विषप्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला परंतू प्रशासनाने प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सदर प्रसंग टाळला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेतकऱ्यांना मिशन प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागू करण्याबाबत**

**(३८) १२१५८४ (३१-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिशन प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत यावर्षी जिल्हयातील ३ लाख १६ हजार शेतकऱ्यांना विम्याचे कवच देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी माहे मे,२०१८ रोजी वा त्यादरम्यान दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना मिशन प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) व (२) सदरची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही. तथापि, कृषि विभागामार्फत राज्यातील ७/१२ धारक शेतकऱ्यांसोबतच त्यांचे कुटुंबीय व शेतमजुर यांना देखील गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या धर्तीवर सुधारीत स्वरुपातील अपघात विमा योजनेंतर्गत संरक्षण देण्यासाठी शासनामार्फत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगाली) तालुक्यातील शेतकऱ्यांनी रेशीम उदयोगाचे अनुदान न मिळाल्याने आत्महत्या केल्याबाबत**

**(३९) १२१८५८ (३१-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आखाडा-बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील सिनगी शिवारात रेशीम उद्योग किटक संगोपन व गृह उभारणीस अनुदान न मिळाल्याने श्री बालाजी रामराव मगर या शेतक-याने दिनांक १४ एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासूमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याला आर्थिक स्वरुपाची मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) होय.
माहे एप्रिल, २०१८ दरम्यान सिंदगी, कळमनुरी येथील शेतकरी बालाजी रामराव मगर यांनी आत्महत्या केलेली आहे. परंतु सदर आत्महत्या रेशीम उद्योगाचे अनुदान न मिळाल्यामुळे झालेली नाही. सदरची आत्महत्या ही कर्जामुळे झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे प्रकरण शेतकरी आत्महत्या म्हणून पात्र करण्यात आले आहे. सदरची आत्महत्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत पात्र झाल्यानुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास शासन निर्णय .२३.०१.२००६ व दि.२७.०२.२००६ मधील निकषाप्रमाणे रू.१.०० लक्ष ची मदत देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडोळा आणि सारखणी (ता.किनवट, जि.नांदेड) येथे कृषि विभाग व विशेष पोलिस पथकाने निकृष्ट दर्जाचे बियाणे जप्त केल्याबाबत**

**(४०) १२२२०५ (३१-०७-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडोळा व सारखणी (ता.किनवट, जि.नांदेड) येथे कृषि विभाग व विशेष पोलिस पथकाने दिनांक १६ एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासुमारास ३२ लाखांचे निकृष्ट दर्जाचे बियाणे जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच किती जणांना अटक करण्यात आले व त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) व (२) नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील वाडोळा येथे कृषि विभाग व विशेष पोलिस पथक, नांदेड यांनी दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी छापा टाकला असता श्री. शेख करीम शेख खाजा मैनुद्दीन यांच्याकडे आढळून आलेले १८,२४० रुपयांचे बोगस बियाणे जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच, सारखणी येथे श्री. किशोर गुलाबराव कदम यांच्या राहत्या घरी छापा टाकून रू.३१ लाख ९२ हजार किंमतीचे बोगस बियाणे जप्त केलेले आहेत.

सदर प्रकरणी श्री. शेख करीम शेख खाजा मैनुद्दीन आणि श्री.किशोर गुलाबराव कदम यांच्याविरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हंगामा पेरणीपूर्वी बाजारपेठेत निकृष्ट दर्जाचे बियाण्यांचा प्रचार होत असल्याबाबत**

**(४१) १२२२२१ (३१-०७-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुलाबी बोंडअळीमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असतांनाही यंदाच्या हंगामातही पेरणी पूर्वी बाजारपेठेत निकृष्ट दर्जाचे बियाणांचा प्रचार होत असल्याचे माहे मे, २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट बियाणे कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

बियाणे खरेदी करत असताना शेतकऱ्यांनी परवानाधारक कृषि निविष्ठा विक्री केंद्रातूनच बियाणे खरेदी करावे. खाजगी माणसाकडून वा अनधिकृत व बोगस बियाणे उत्पादक कंपनीच्या

प्रतिनिधीकडून बियाणे खरेदी करू नये याबाबत जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्राम पातळीवर शेतकऱ्यांच्या सभा घेऊन बियाणे खरेदीबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

शेतकऱ्यांनी परवानाधारक कृषि निविष्ठा विक्री केंद्रातूनच बियाणे खरेदी करताना बियाणे खरेदीची पावती घेणेबाबत ग्राम पातळीवरील सभेत तसेच, वेळोवेळी वर्तमानपत्रात प्रसिद्धी देऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आलेली आहे.

अधिकृत उत्पादक कंपन्या व त्यांचे परवानाप्राप्त अधिकृत वाणांची माहिती वृत्तपत्र तसेच, वेबसाईटद्वारे शेतकऱ्यांना माहितीसाठी जाहिर करण्यात आलेली आहे.

सर्व बाजारपेठेतील परवानाधारक कृषि निविष्ठा विक्री केंद्राची हंगामपुर्व गुणनियंत्रण निरीक्षकामार्फत तपासणी करून बोगस बियाणे नसल्याची खात्री करण्यात आलेली आहे.

आठवडीबाजारात अनधिकृत व बोगस बियाणे उत्पादक कंपनीच्या प्रतिनिधींकडून बियाणे विक्री होऊ नये म्हणून माहे मे २०१८ व माहे जून २०१८ मध्ये गुणनियंत्रण निरीक्षकामार्फत विशेष मोहिम राबवून त्यामध्ये नियंत्रण ठेवण्यात आले.

राज्यात अनधिकृत बियाणांची विक्री होणार नाही व बियाणांच्या पुरवठ्याचे सनियंत्रण योग्य प्रकारे होईल याबाबतची दक्षता घेण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक यांना सुचना दिलेल्या आहेत.

(२) राज्यात सन २०१८ मध्ये एकूण १६,४३२ अनधिकृत बियाणांची पाकीटे व ८८३ किलो सुटे बियाणे जप्त करण्यात आलेले असून या संदर्भात एकूण ३० ठिकाणी पोलीस केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यामधील लघु चिकित्सालयात**
**कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४२) १२२२५२ (२५-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये ८ हजारापेक्षा जास्त पशुधन असलेल्या तालुका लघु चिकित्सालयात ४ वर्षापासून परिचर पदे, १ वर्षापासून पशुपट्टीबंधक व सहाय्यक आयुक्त सेवा निवृत्त झाल्यापासून त्यांचे पद एक वर्षापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पशु चिकित्सालयाचे कार्यक्षेत्र असलेल्या वारेवडगांव, भोनगिरी, रामकुंड, वाकवड, वंजारवाडी, हाडोग्री, हिवरा व दिंडोरी या गावातील पशुधनावर उपचार करण्यात उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो, तसेच पशुधन विकास अधिकाऱ्यासह एक वरिष्ठ लिपिक असे दोनच कर्मचारी असल्याने कृत्रिम रेतन, औषधोपचार, गर्भधारणा तपासणी वंध्यत्व तपासणी आदि कामे करावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तद्नुसार तालुका लघु पशुसंवर्धन चिकित्सालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१२-११-२०१८) :** (१) होय.

तथापि, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन विकास अधिकारी यांच्याकडे दिलेला आहे.

(२) सदर कार्यक्षेत्रातील सर्व तांत्रिक कामे उदा. लसीकरण, कृत्रिम रेतन, औषधोपचार, गर्भधारणा तपासणी, वंध्यत्व तपासणी, शासकीय योजना (नाविण्यपुर्ण योजन एनडीडीबी) आदी कामे उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून करुन घेण्यात येत असून, पशुधनावर योग्य व तातडीने औषध उपचार करण्यात येत आहेत. पशुपालकांना वेळेत सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(३) दवाखान्यात रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपळखुटी (ता केळापूर) येथील चेकपोस्ट वरून जनावराची अवैधरित्या होत असलेली वाहतुक**

**(४३) १२२४२३ (०१-०८-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळखुटी (ता केळापूर,जि.यवतमाळ) येथील आर.टी.ओ.चेक पोस्ट जवळ जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या टॅक्सला आग लागल्याने जवळपास २८ जनावरांचा आगीत मृत्यृ झाल्याचे दिनांक १८ मे २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपळखुटी चेकपोस्टवर आर.टी.ओ.कार्यालय, यवतमाळ यांनी ठेवलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन अवैध वाहतुक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार आर.टी.ओ.कार्यालय यवतमाळ यांच्या दुर्लक्षामुळे होत असलेली अवैध वाहतुकीबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-११-२०१८) :** (१) हे खरे आहे,

पिंपळखुटी (ता. केळापूर) येथील सिमा तपासणी नाक्यावरुन जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणा-या ट्रकला दि.१६.०५.२०१८ रोजी आग लागल्याने त्यातील काही जनावरांचा आगीत होरपळून मृत्यु झाला आहे.

(२) महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र बार्डर चेक पोस्ट नेटवर्क मर्यादीत या कंपनीमध्ये झालेल्या करारानुसार महाराष्ट्र बार्डर चेक पोस्ट नेटवर्क मर्यादीत या कंपनीचे कर्मचारी पिंपळखुटी येथील सीमा तपासणी नाक्यावर कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून अवैध वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यवतमाळ यांच्यामार्फत दि.०१.०४.२०१६ ते ३१.०५.२०१८ या कालावधीमध्ये जनावरांच्या अवैध वाहतुकीसंदर्भात एकुण ५८ वाहनांची तपासणी करण्यात

आली असून दोषी आढळलेल्या २० वाहनांपैकी १० वाहने अटकावून ठेवण्यात आली आहेत व रु.१९,६००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि. सोलापुर) येथील शेतकऱ्यांच्या ज्वारी पिकाला हमी भाव देण्याबाबत**

**(४४) १२२६२७ (२६-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापुर) येथे ज्वारी व कडब्याचे उत्पादन घटले असून परिणामी बाजार पेठेमध्ये आवक कमी असूनही ज्वारीचे दर घसरले असल्यामुळे मंगळवेढा येथील ज्वारी उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी संबधीत शेतकऱ्यांनी ज्वारीच्या पिकासाठी हमी भावामध्ये वाढ करणे व ज्वारीपासून उपपदार्थ निर्मितीसाठी शासनाने प्रयत्न करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन ज्वारीला हमी भाव वाढविण्याबाबत व ज्वारीपासून उपपदार्थ निर्मितीसाठी प्रयत्न करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-११-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) किमान आधारभूत किंमत जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. खरीप हंगाम सन २०१८-१९ पासून केंद्र शासन शेतक-यांच्या फायद्यासाठी उत्पादन खर्चावर ५० % नफा धरुन किमान आधारभूत किंमत जाहीर करत आहे.
केंद्र शासनाने खरीप विक्री हंगाम सन २०१८-१९ साठी ज्वारी पिकाकरिता रु. २४३०/- इतकी किमान आधारभूत किंमत जाहीर केलेली आहे.
सन २०१८ वर्ष हे भरडधान्य वर्ष म्हणून साजरे करण्याचे केंद्र शासनाने घोषीत केलेले आहे. त्यानुसार ज्वारी, बाजरी यासारख्या भरडधान्य प्रक्रिया प्रकल्प सुरु करण्यात आलेले आहे.
अन्नधान्य, कडधान्य इ. आधारित प्रकल्प उद्योगाला चालना देणेसाठी "मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना" चालु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोल महाबिज बिज प्रक्रीया केंद्रावरील कार्यरत कामगारांना**
**कायमस्वरूपी सेवेत समावून घेणेबाबत**

**(४५) १२२६८० (३१-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महाबिज बिज प्रक्रीया केंद्रावरील कार्यरत कार्यकुशल रोजंदारी कामगारांना एकत्रित मासिक वेतनावर कायमस्वरूपी सेवेत समावून घेण्यासाठी कर्मचा-यांनी मंत्रालया समोर केलेल्या उपोषणाची दखल घेत व्यवस्थापनाकडून त्यांना आश्वसीत करूनही कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कार्यरत कार्यकुशल रोजंदारी कामगारांना एकत्रित मासिक वेतनावर कायमस्वरूपी सेवेत समावून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१८) :** (१) नाही.
(२) अकोला येथील महाबीज बिज प्रक्रिया केंद्रावरील कार्यरत कार्यकुशल रोजंदारी कामागारांना एकत्रित मासिक वेतनावर कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्यासाठी महाबीजाने आश्वासित केलेले नाही. कारण कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांची भरती ही जाहिरात देवून पात्र उमेदवाराची निवड शासनाच्या नियमानूसार केली जाते. रोजंदारी कर्मचाऱ्याने जाहिरातीस अनुसरुन अर्ज केल्यास, व तो निवड प्रक्रियेत पात्र ठरल्यास रोजंदारी कामगारांच्या निवडीस प्राधान्यक्रम दिला जातो. तसेच, कार्यकुशल रोजंदारी कामगारांना व बाह्यस्त्रोताद्यारे अधिकृत व महामंडळाने नेमलेल्या ठेकेदारामार्फत कार्यरत असलेल्या कार्यकुशल रोजंदारी कामगारांना कामगार कायद्यानुसार लागु असलेले सर्व लाभ देण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दहिसर कांदरपाडा (बोरिवली) येथील आरटीओ कार्यालयाच्या समस्यांबाबत

**(४६) १२२९२६ (२४-०७-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर कांदरपाडा येथे राज्य सरकारने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दहिसर ते गोरेगावच्या नागरिकांसाठी बोरीवली उपप्रादेशिक वाहन (आरटीओ) कार्यालय सुरु केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी आरटीओ कार्यालयास अपुरी जागा, अपुरा कर्मचारी वर्ग, चाचणीसाठी ट्रॅकचा अभाव इ.अनेक समस्या असून कार्यालय स्थलांतराच्या मागणीसाठी या कार्यालय परिसरातील स्थानिकांनी स्वाक्षरी मोहीम राबवली असून, काही वेळा तेथील स्थानिक रहिवासींनी परिवहन निरीक्षक अधिकाऱ्यांशी गैरवर्तन केले असल्याचेही दि. १९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोरीवली उपप्रादेशिक वाहन (आरटीओ) कार्यालयाच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरिवली च्या स्थलांतराच्या मागणीसाठी स्थानिकांनी स्वाक्षरी मोहीम राबविली ही बाब खरी आहे. तथापि, स्थानिकांनी मोटार वाहन निरीक्षकांशी गैरवर्तन केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरिवली या कार्यालयाची जागा ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची असून ती भाडे तत्वावर घेण्यात आली आहे. सदर जागा अपूरी असल्याने सदर कार्यालयाच्या इमारतीसाठी व चाचणी पथ तयार करण्यासाठी मध्यवर्ती दुग्धशाळा,आरे येथील दुग्ध परिवहन सेवा डेपोची जागा जशी आहे तशी या स्थितीत तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देण्यास कृषी, पशुसंवर्धन दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांनी मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उदगीर (जि.लातूर) तालुक्यात उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(४७) १२३६५५ (३१-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) तालुक्यात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मागणीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उदगीर तालुक्यात उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

शासन निर्णय क्र. एमव्हीडी-०८१५/प्र.क्र.२३३/परि-४, दि.१८.०६.२०१८ अन्वये मोटार वाहन विभागांतर्गत नवीन कार्यालय निर्मितीसाठी खालील निकष विहित करण्यात आले आहेत.

अ) एखाद्या जिल्हयाचे विभाजन होऊन नवीन जिल्हा निर्माण झाला असेल तर या नवीन जिल्हयाच्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन परिवहन कार्यालयाची स्थापना करावी. इतर कोणत्याही परिस्थितीत नवीन कार्यालयाची स्थापना करु नये.

ब) ज्या जिल्हयांची लांबी जास्त आहे अशा जिल्हयांमध्ये जनतेच्या सोईसाठी नवीन परिवहन कार्यालय उघडण्याऐवजी वाहन चालक चाचणी केंद्र तसेच वाहन तपासणी व परिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत.

उपरोक्त निकषांच्या अनुषंगाने उदगीर जि. लातूर येथे नविन उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची निर्मिती करता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पाल (ता.रावेर, जि.जळगांव) येथे उद्यानविद्या महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(४८) १२४०६८ (२५-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाल (ता.रावेर, जि.जळगांव) येथे उद्यानविद्या महाविद्यालय सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे पाल येथे उद्यानविद्या महाविद्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-११-२०१८) :** (१) होय.

(२) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मौजे पाल ता. रावेर, जि. जळगांव येथे उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्याबाबत तसेच त्यासाठी आवश्यक १०१ पदे आणि एकुण रु. ६५६९.७० लाख खर्चास कृषि परिषदेचा ठराव क्र. ८५/९०/२०१५ अन्वये मान्यता प्रदान करुन प्रस्ताव शासनाकडे शिफारशीत करण्यात आला. प्रस्तावित महाविद्यालयासाठी आवश्यक ४० हेक्टर जमीनीच्या उपलब्धतेबाबत विद्यापीठस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि सदरचा प्रस्ताव चौथ्या अधिष्ठाता समितीच्या निकषानुसार सादर करण्यात आला आहे.

यास्तव भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या निकषानुसार मौजे. पाल, ता. रावेर, जि. जळगाव येथे उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने कृषि परिषदेमार्फत शासनास सादर करण्याबाबत विद्यापीठास सूचित करण्यात आले आहे. सुधारीत प्रस्ताव अद्याप विद्यापीठाकडून प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**पश्चिम विदर्भातील (वऱ्हाड) प्रदेशात पावसाचे असमान वितरण व असंतुलनामुळे भूगर्भातील जलपातळी कमी झाल्याबाबत**

**(४९) १२४३८५ (०१-०८-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील (वऱ्हाड) प्रदेशात पावसाचे असमान वितरण व असंतुलनामुळे भूगर्भातील जलपातळी ४ मीटरने कमी झाल्याचा निष्कर्ष डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी अहवाल प्रकाशीत केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम विदर्भातील ४ जिल्ह्यातील १६ तालुक्यातील खारपाण पट्ट्यात मोडत असलेली ८९२ गावात पाणी व पाण्याच्या क्षारतेमुळे कृषी उत्पन्न कमी होणे तसेच पाणी आरोग्यास अपायकारक असल्यामुळे शेतकऱ्यांचे सामाजिक व आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) पश्चिम विदर्भातील खारपट्ट्यात भुगर्भातील पाणी क्षारयुक्त असल्यामुळे पिकाच्या सिंचनासाठी वापरणे योग्य नाही. त्यामुळे या भागात जिरायती पीके घेण्यात येतात. त्यामुळे पिकाची उत्पादकता कमी आहे. तसेच चोपण व क्षारयुक्त जमिनी असल्यामुळे निचरा कमी आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात बिजोत्पादन कमी झाल्याबाबत**

**(५०) १२५४०९ (३१-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बिजोत्पादन कमी झाल्यामुळे बियाण्याकरीता मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तेलंगना, कर्नाटक इत्यादी राज्यांवर अवलंबून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
संकरीत ज्वारी, संकरीत धान, संकरीत मका, संकरीत चारा इ पिकांच्या बीजोत्पादनास राज्यातील हवामान योग्य व अनुकूल नसल्यामुळे या पिकांचा बीजोत्पादन कार्यक्रम इतर राज्यात घेतल्याशिवाय पर्याय नाही. अशा प्रकारे परराज्यात बीजोत्पादन घेण्याचे प्रमाण १५ ते २० टक्के असून उर्वरीत ८० ते ८५ टक्के बीजोत्पादनाचा कार्यक्रम राज्यात राबवून शेतकऱ्यांना वेळेवर व माफक दरात बियाणे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादीत (महाबीज), अकोला यांच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येते.
(२) महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे राज्यातील बीजोत्पादन कार्यक्रमावर संपुर्ण नियंत्रण असून त्यांच्या कृषि अधिकाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांच्या क्षेत्रावर राबविलेल्या बीजोत्पादन कार्यक्रमाची नियमित तपासणी करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**      **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.**      **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.